This Booklet contains **16** printed pages.
इस पुस्तिका में **16** मुद्रित पृष्ठ हैं।

# AK14II

**Test Booklet No.**
**परीक्षा पुस्तिका संख्या**

## PAPER—II / प्रश्न-पत्र—II

## MARATHI LANGUAGE SUPPLEMENT / मराठी भाषा परिशिष्ट

## PART—IV & V / भाग—IV & V

**Test Booklet Code**
**परीक्षा पुस्तिका संकेत**

**N**

Do not open this Test Booklet until you are asked to do so.
इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।
Read carefully the Instructions on the Back Cover (Pages 15 & 16) of this Test Booklet.
इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 15 व 16) पर दिए गए निर्देशों को ध्यान से पढ़ें।
**For Instructions in Marathi see Page-2 of this Booklet.**
**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें।**

### *Instructions for Candidates :*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part—IV (Language—I) **OR** Part—V (Language—II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part—I, and Part—II OR III from the Main Test Booklet and Parts—IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part—IV and Part—V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Blue/Black Ballpoint Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **N**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **Two** Parts—IV and V, consisting of **60** Objective-type Questions and each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. Nos. 91–120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. Nos. 121–150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi Language have been given. **In case the language(s) you have opted for as Language-I and/or Language-II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that Language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

### *परीक्षार्थियों के लिए निर्देश :*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है उन परीक्षार्थियों के लिए जो या तो भाग—IV (भाषा—I) **या** भाग—V (भाषा—II) का उत्तर **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों** नहीं।
2. परीक्षार्थी भाग—I, एवं भाग—II या III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग—IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग—IV व भाग—V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर-पत्र पर निशान लगाने के लिए **केवल नीले/काले बॉलपॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का संकेत **N** है। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग—IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं तथा प्रत्येक 1 अंक का है :
   भाग–IV : भाषा–I (मराठी) (प्रश्न सं० 91–120)
   भाग–V : भाषा–II (मराठी) (प्रश्न सं० 121–150)
7. भाग–IV में भाषा–I के लिए 30 प्रश्न और भाग–V में भाषा–II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा–I और/या भाषा–II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है/हैं, तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लें। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग–V (भाषा–II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा–I (भाग–IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ़ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर-पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

Name of the Candidate (in Capitals) : ____________________
परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में)

Roll Number (in figures) : ____________________
अनुक्रमांक (अंकों में)
(in words) : ____________________
(शब्दों में)

Centre of Examination (in Capitals) : ____________________
परीक्षा-केन्द्र (बड़े अक्षरों में)

Candidate's Signature : ____________________ Invigilator's Signature : ____________________
परीक्षार्थी के हस्ताक्षर निरीक्षक के हस्ताक्षर

Facsimile signature stamp of Centre Superintendent ____________________

**11-II**

ही पुस्तिका 16 प्रष्ठ आहे.

**AK14II**

चाचणी पुस्तिका कोड

**N**

**प्रश्नपत्रिका—II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग—IV & V**

ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.

या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (15 आणि 16) सूचना काळजीपूर्वक वाचा.

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, की जे **मराठी** भाषेतील भाग—IV (भाषा—I) **किंवा** भाग—V (भाषा—II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग—I, आणि भाग—II किंवा III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग—IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग—IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ निळे/काळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड N** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर. परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्र. सं. 91 ते 120)

   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्र. सं. 121 ते 150)
7. भाग—IV मध्ये भाषा—I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग—V मध्ये भाषा—II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा—I व/वा भाषा—II साठी निवडलेली भाषा मराठी पेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग—V (भाषा—II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा—I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ____________________

अनुक्रमांक (अंकांमध्ये) : ____________________

(शब्दांमध्ये) : ____________________

परीक्षाकेंद्र : ____________________

परीक्षार्थीची सही : ____________________ पर्यवेक्षकाची सही : ____________________

Facsimile signature stamp of Centre Superintendent ____________________

भाषा—I चा विकल्प मराठी निवडला असणाऱ्या परिक्षार्थीनेच केवळ खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

# भाग—IV : भाषा—I

## मराठी

*सूचना* : सर्वात योग्य पर्याय निवडा (प्र० क्रं० **91** ते **105**) :

**91.** जेव्हा विद्यार्थी संवाद क्षमतेतून बोलण्याचा अर्थ काढायला लागतो. तेव्हा समजायचे की त्यांनी

(1) आपल्या अभ्यासक्रमाला लक्षात घेऊन शिक्षकांकडून शंका समाधान करुन घ्यावी

(2) नियमित शब्दकोष वापरावा. त्यामुळे शब्दांचा त्यांना नेमका अर्थ व वापर कळेल

(3) माहितीची आदान-प्रदान करावी, अर्थ समजून घ्यावे आणि आकलन सुलभतेसाठी नव्या शब्दात मांडणी करावी

(4) व्याकरणाची मांडणी वापरावी

**92.** खालीलपैकी कोणते भाषिक कौशल्य क्रमानुरुप योग्य आहे.

(1) बोलणे—ऐकणे—वाचणे—लिहिणे

(2) ऐकणे—बोलणे—लिहिणे—वाचणे

(3) ऐकणे—बोलणे—वाचणे—लिहिणे

(4) ऐकणे—वाचणे—बोलणे—लिहिणे

**93.** भाषा शिकणे हे अधिक सोयिस्कर झाले असते, जर ते हे शिकले असते

(1) भाषा वर्ग खोलीत नियंत्रित वातावरण निर्माण करणे

(2) भाषा आपल्या अत्यंत जवळची बाब असून मातृभाषेला ती मजबूत करते

(3) भाषा महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी सहाय्यभूत ठरते

(4) भाषा आयुष्यातील मूल्य आणि उद्दिष्टयपूर्तीसाठीही क्रियात्मक ठरते

**94.** विद्यार्थ्यांना अपेक्षीत उत्तरांच्या यादीतून योग्य उत्तराची निवड करायचा उपक्रम दिला आहे. त्यांना ध्वनीफीत सुरु झाल्यावर अपेक्षीत उत्तरांच्या नोंदीतून उत्तरे शोधायची आहे. अशावेळी ध्वनीफित सुरू होण्याआधी विद्यार्थ्यांची भूमिका काय ठरते

(1) अपेक्षीत उत्तरांच्या नोंदीतून योग्य पर्याय सूचविणे

(2) वस्तूस्थिती तपासणे

(3) प्रश्नांसाठी गृहीत उत्तर तयार करणे

(4) गहाळ माहिती भरणे

**95.** बोलण्याच्या फायद्यासाठी विद्यार्थी भाषेचा आनंद घेतात. हा उपक्रम अधिक प्रभावीपणे वापरला जाऊ शकतो. केव्हा?

(1) शब्दसंग्रहाचा वापर करण्याची विशेष यादी देऊन

(2) योग्य रचना आणि उच्चारासाठी वापरल्यास

(3) लेखन/वाचनाच्या माध्यमातून उपक्रमात अडथळा आणल्यास

(4) विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाची उद्दिष्ठपूर्ती होण्यासाठी त्यांना प्रेरित करून

**96.** मानवी विचार आणि मानवी संवाद यांना लिहिणे व वाचणे या प्रक्रीयेच्या माध्यामातून जोडण्याचा मार्ग म्हणजे

(1) भाषेचे उच्चारण

(2) शब्दांचे भांडवल आणि विरामचिन्हे

(3) उच्चारण आणि ताण

(4) भाषेची व्याकरणीय रचना

**97.** शिक्षकाने व्याकरणीय रचना व्हीडीओद्वारे समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी प्रभावी संवादासाठी व लिखाणासाठी व्याकरणीय रचनेचा उपयोग केला. पद्धत कोणती?

(1) रचनात्मक (Constructive)

(2) अनुमानजन्य (Inductive)

(3) अणुमाणिक (Deductive)

(4) रुप बदलणे ऱ्हास पावणे (Reductive)

**98.** विद्यार्थ्यांच्या लिखाणातील चूका दुरुस्त करण्याची पद्धत प्रभावी ठरते, जेव्हा शिक्षक

(1) विद्यार्थी चुकीची दुरुस्ती करेपर्यंत विद्यार्थ्यांना अतिरिक्त काम देतो

(2) फळ्यावर योग्य उत्तर लिहून देतो

(3) चुकीची दुरुस्ती करुन देतो

(4) चिन्हांच्या मदतीने चूक लक्षात आणतो आणि विद्यार्थी चूक स्वतः दुरुस्त करतो

**99.** वर्गाच्या बाहेर किंवा आतमध्ये L1 आणि L3 विषयाला ऐकूण आशय समजून घेण्यात विद्यार्थ्यांना समस्या येते. ही समस्या दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांना काय उपयोगी पडू शकते?

(1) स्थानिक शिक्षकांकडून शिक्षण प्राप्त करणे

(2) L2 आणि L3 विषयांचे तास वाढविणे

(3) भाषेचा अधिक योग्य उपयोग करुन सराव करणे

(4) L1 भाषेशी जवळीक असणारी दुसरी भाषा निवडणे

**100.** विद्यार्थ्याला पूर्ण मजकूर समजून सांगण्याच्या प्रक्रीयेत अनोळखी शब्द जर वाचन उपक्रमाला अडथळा ठरत असेल तर

(1) किंवा सोप्या शब्दाचा मजकूर वापरावा

(2) शब्द ओळखण्यासाठी शब्दकोषाचा तातडीने वापर करावा

(3) शिक्षकांना किंवा शेजाऱ्यांना शब्दार्थ विचारावा

(4) शब्दार्थ समजण्यासाठी संबंधीत शब्दाच्या संदर्भाचा वापर करावा

**101.** वाचनाच्या आकलनाचा उच्चस्तर कशावरुन दिसतो?

(1) मजकुरातील विद्यार्थ्यांचे स्वतःचे शब्द, प्रमुख शब्दांचे पूर्ण वाक्याचे पुनर्लेखन आणि मजकुरातील शब्दांचे वेगळे अर्थ शोधून

(2) मजकूरातील मोजक्या व प्रमुख शब्दांचा वेगळा अर्थ लिहून काढल्याने

(3) विद्यार्थ्यांचे स्वतःचे शब्द आणि प्रमुख शब्दांचे पुनर्लेखन करुन

(4) विद्यार्थ्यांचे स्वतःचे शब्द मजकुरातील अपूर्ण वाक्यांचे पुनर्लेखन करुन

**102.** लिखाणाच्या समृद्धीची नोंद घेण्याचा पहिला दृष्टीकोण कोणता?

(1) व्याकरणीय रचना

(2) शब्द मर्यादा, कारण ते महत्त्वपूर्ण आहे

(3) मजकुराची समर्पकता आणि त्याला मांडण्याची वेगळी कल्पनाशक्ती

(4) लिहिणा-यांच्या शब्दांचे सामर्थ्य

**103.** भाषा शिकताना व स्वतंत्रपणे अभ्यास करताना मोठया प्रमाणात संदर्भ, आणि वाचन उपक्रमाची फलश्रुती देण्यासाठी कोणती मदत शिकणाऱ्यासाठी संधी ठरते?

(1) दूरस्थ

(2) तयार कार्यक्रमपत्रिका

(3) संगणकीय मदत

(4) थेट आदेश

**104.** स्वतःची भाषा बोलणारे विद्यार्थी आणि उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषा शिकणारे विद्यार्थी असणाऱ्या द्विभाषिक वर्गात कोणता फायदा असतो

(1) विद्यार्थी वर्गात कमी बोलल्याने गोंधळ कमी होतो

(2) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना दुसरी भाषा शिकण्याची प्रेरणा मिळते

(3) वेगळा प्रकल्प करण्यासाठी संधी मिळते

(4) प्रत्येक भाषेत विविध उपक्रम राबविण्याचे समाधान मिळते

**105.** विद्यार्थी शिकलेल्या अभ्यासाचा उपयोग करु शकत नाही. उदाहरणार्थ शब्दार्थ न समजल्याने वाक्याचे भाषांतर न करणे, समीकरण किंवा आकडे न समजणे. यासाठी कोणती उपाययोजना आहे.

(1) आत्मविश्वास वाढविण्यासाठी सोपे काम बहाल करणे

(2) सक्षम विद्यार्थ्यांसाठी मदत मागणे

(3) त्याची अडचण दूर करणारे सोप्यात सोप कार्य देणे

(4) उपक्रम पूर्ण करण्यासाठी त्याला अधिक वेळ देणे

**सूचना** (प्रश्न संख्या **106** ते **114**) : पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा ...

संध्याकाळची वेळ झाडे कसल्या तरी गूढ तंद्रीत उभी होती. हवेत प्रसन्नता भरुन राहिली होती. अशा वेळी अंगणात मोकळ्यावर खुर्च्या टाकून मजेत गप्पा करण्यात किती आनंद असतो हे अनुभवाशिवाय कळायचे नाही. नेहमीप्रमाणे त्या दिवशी आम्ही गप्पा करायला बसलो होतो. गप्पा अगदी ऐन रंगात आल्या होत्या. इतक्यात कुणी तरी आकाशत पाहिले. पिवळसर सोनेरी रंगाचा चंद्र उगवला होता. या रंगाच्या पार्श्वभूमीवर चंद्रावरचा काळा ससा उठून दिसत होता. आजूबाजूच्या आकाशाला काही निराळेच मार्दव आले होते. ढगाच्या मनात सोनेरी आनंद चमकत होता. इतक्यात अंगावर पाण्याचे दोनचार कोवळे थेंब आले. बघताबघता श्रावणातली मिष्किल लहरी सर आम्हाला भिजवू लागली. आम्हाला कुणालाही उठण्याचे भान नव्हते. असे दृश्य नेहमी थोडेच दिसते? चंद्र-आजूबाजूचा तो सोनेरी रंग आणि त्यात पावसाची नाजूक झिमझिम ! एखाद्या कथा-कादंबरीत या दृश्याचे वर्णन आले असते तर विश्वाससुद्धा बसला नसता, पण त्या क्षणी हे अदभूत सुंदर दृश्य आम्ही डोळ्यांनी पाहात होतो. इतक्यात कुणी तरी म्हणाले, 'पाहा ना बिचाऱ्या चंद्राची फजिती ! मोठया दिमाखानं सजून आला होता. त्याचा सगळा सोनेरी साज आता भिजून गेला असेल नाही?' आम्ही सगळे कौतुकाने हसलो. इतक्यात एकजण मोठयाने म्हणाला, 'मुर्खपणाची कमाल झाली बुआ ! अहो, चंद्र कधी भिजेल काय? चंद्र आणि पृथ्वी यात ...'

चंद्र आणि पृथ्वी यात किती अंतर आहे हे आम्ही सर्वांनीच लहानपणी भूगोलात पाठ केले होते. अशा या सुंदर क्षणी या सदगृहस्थांना हे ज्ञान आम्हाला पुन्हा पाजू देण्याची संधी आम्हाला द्यायची नव्हती. आम्हाला मनातल्या मनात ते गृहस्थ हसत असतील, मुर्खात काढीत असतील याची आम्हाला जाणीव होती, तरीही धुंद होऊन आम्ही चंद्राकडे बघत होतो. आमच्या डोळयांसमोर चंद्र भिजतच होता.

या गोष्टीला बरेच दिवस झाले, परंतु त्या गृहस्थाची आठवण माझ्या मनात अगदी घर करुन आहे. खरेच, त्या गृहस्थाला भोवतीच्या सृष्टीतले आणि जीवनांतले सौंदर्य टिपून घेता येत असेल का? की सगळयाच गोष्टींवर आपल्या तर्काचे शस्त्र तो चालवीत असेल? त्या दिवशी आम्हा सगळ्यांना त्याने मूर्खात काढले. त्यांच्याइतकेंच, किंबहुना त्याच्याहून अधिक शास्त्रीय ज्ञान आम्हाला होते याची त्याला कल्पनाही असू नये? शास्त्रीय सत्य आम्हाला माहीत होते, परंतु त्या सत्याच्या ओझ्याने आमचे मन वाकलेले नव्हते.

**106.** चंद्राला पृथ्वीचा काय संबोधतात?
(1) कवीचा कल्पनाविलास
(2) पृथ्वीचा उपग्रह
(3) ससाच्या डाग असणारा ग्रह
(4) पृथ्वीचा मामा

**107.** उता-यातील लिखाण कोणत्या शैलीतील आहे
(1) विनोदी
(2) माहितीपूर्ण
(3) साहसी
(4) साहित्यिक

**108.** लेखकाने कुठे बसून चंद्रदर्शनाचा आनंद घेतला?
(1) अंगणात
(2) छतावर
(3) शेतावर
(4) शेकोटीच्या बाजुला

**109.** चंद्राच्या संदर्भात उता-यात काय अप्रासंगिक आहे?
(1) भिजून गेलेला चंद्र
(2) चंद्रावरचा काळा ससा
(3) पिवळसर सोनेरी रंगाचा चंद्र
(4) चंद्र आणि पृथ्वीतील अंतर

**110.** चंद्राची फजिती का झाली?
(1) वरिल तीनही पर्यायाने
(2) त्याचे अंतर मोजल्याने
(3) अचानक पाऊस आल्याने
(4) पिवळसर सोनेरी रंगामुळे

**111.** चंद्र आणि सूर्य याची शास्त्रीय माहिती कशात आहे?
(1) पंचाग
(2) भूगोल
(3) साहित्यात
(4) सिनेमा

**112.** लेखकाला त्या गृहस्थाबद्दल खंत का वाटते?

(1) त्याला पृथ्वी-चंद्रातील अंतर माहिती असल्यामुळे

(2) त्याच्या तर्कशास्त्रातील ज्ञानाबाबत

(3) लेखकाच्या कवी कल्पनेत बाधा आणल्याबददल

(4) सृष्टीसौंदर्यापासून तो अनभिज्ञ असल्याबददल

**113.** खालीलपैकी कोणता पर्याय समर्पक नाही?

(1) सजलेला चंद्र

(2) चंद्रावरचा काळा ससा

(3) भीजलेला चंद्र

(4) सोनेरी चंद्र

**114.** या उता-याला समर्पक शिर्षक कोणते ठरेल?

(1) एक प्रसन्न संध्याकाळ

(2) निंबोणीच्या झाडामागे

(3) निरस तर्कशास्त्र

(4) भीजलेला चंद्र

*सूचना* (प्रश्न संख्या **115** ते **120**) : पुढील कविता वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे योग्य तो पर्याय निवडून लिहा.

असेन मी, नसेन मी; तरी असेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या, उद्या हसेल गीत हे.

हवेत ऊब भोवती सुवास धुंद दाटले
तसेच काहिसे मनी तुला बघून वाटले
उन्हे जळात हालती जिथे वसेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे.

स्वये मनात जागते न सूर ताल मागते
अबोल राहुनी स्वतः अबोध गूज सांगते
तृणात फूलपाखरु तसे बसेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे.

तुला मला न ठाउके पुन्हा कधी कुठे असू?
निळ्या नभात रेखली नकोस भावना पुसू
उरी भरुन राहिले तुला दिसेल गीत हे
फुलाफुलांत येथल्या उद्या हसेल गीत हे !

**115.** कवयित्रीने आपली भावना कुठे रेखाटली आहे?

(1) घराघरात (2) फुलाफुलांत

(3) पानापानात (4) निळ्या नभात

**116.** खालिलपैकी कोणती जोडी अयोग्य आहे?

(1) निळया–नभात

(2) सूर–ताल

(3) धुंद–सुवास

(4) मनाच्या–धुंदीत

**117.** तृण शब्दांचा अर्थ ——— हा आहे.

(1) काडीकचरा

(2) चारा

(3) तणकट

(4) गवत

**118.** कवयित्रीचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण कसा आहे?

(1) नेमस्त

(2) आशावादी

(3) निराशावादी

(4) तटस्थ

**119.** अबोल राहूनी अबोध गुज सांगते या ओळीचा अर्थ काय?

(1) काही न बोलता हवे तेच कळविणे

(2) काही न बोलता केवळ खुणावणे

(3) फक्त ओठांची हालचाल करणे

(4) आवाज न करता स्पर्शातून कळविणे

**120.** या कवितेला समर्पक शिर्षक कोणते?

(1) फुलाफुलांतील गीत

(2) असेन मी नसेन मी

(3) अबोल गीत

(4) हसरे गीत

**भाषा—II चा विकल्प मराठी निवडला असणाऱ्या परिक्षार्थींनेच केवळ खालील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.** →

## भाग—V : भाषा—II

### मराठी

*सूचना* : सर्वात योग्य पर्याय निवडा (प्र० क्रं० **121** ते **135**) :

**121.** विद्यार्थ्यांना स्वतःचे ज्ञान निर्माण करणारे समजले जाते. हे भाषेच्या वर्गात कशाच्या माध्यमातून साध्य केले जाऊ शकते.

(1) व्यक्तिगत प्रकल्पांकडे शिक्षकाने लक्ष वेधून आणि त्याला प्रतिसाद देऊन

(2) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेतील वाचन वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करुन

(3) विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी वाढविणाऱ्या साहित्याची मोठया प्रमाणात उपलब्धता करुन

(4) व्यक्तिगत लक्ष वेधून अभ्यासाच्या प्रक्रीयेत सहअध्ययन आणि सहभागाची संधी देऊन

**122.** उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेमध्ये संभाषण करणे विद्यार्थ्यांना आवडेल असे वातावरण शिक्षक कोणत्या मार्गाने करु शकतो

(1) दृकश्राव्य (इलेक्ट्रॉनिक्स) माध्यमांचा वापर करुन

(2) विद्यार्थ्यांना आनंददायक वाटेल अशा भाषेत संभाषणाची मोकळीक देऊन

(3) काही वाक्यांना वर्गामध्ये नियमित संभाषणात, संवादात वापरण्याचा आग्रह धरुन व त्यात नियमित सुधारणा करुन

(4) लेखन व संभाषणाचे नियमित मूल्यांकन करुन

**123.** जेव्हा आम्ही भाषा नैसर्गिकरित्या शिकतो म्हणजे तेव्हा नेमके काय करतो?

(1) प्रभावी संवादावर लक्ष केंद्रीत करतो

(2) आपल्याला कसे बोलायचे यापेक्षा काय म्हणायचे आहे यावर अधिक लक्ष केंद्रीत करतो

(3) आपल्या आई-वडिलांकडून ऐकतो

(4) स्वतःच्या बळावर वाचन करतो आणि माहिती असणारे शब्दच फक्त वापरतो

**124.** ध्वनीमुद्रीका ऐकून विद्यार्थ्यांना नोंदी घ्यायला सांगणे. या उपक्रमाला काय म्हणाल?

(1) अर्थ लावणे

(2) माहितीचे हस्तांतरण

(3) भाकीत वर्तविणे

(4) आठविण्याची प्रक्रिया

**125.** खालील दिलेल्या वाक्यांचा उपयोग विद्यार्थ्यांची कोणती शैली विकसित करण्यास योग्य ठरेल?

- गेल्या आठवडयात तुझ्या पॉकिटमनीतून खरेदी केलेल्या वस्तूंचे तू काय केले?
- तुझे शहर कशासाठी प्रसिद्ध आहे?
- तू घरामध्ये कोणती मदत करतो?
- तुझ्या छंदाबद्दल मला अधिक माहिती दे

(1) शब्दसंग्रह (2) संभाषण

(3) लेखन (4) ऐकणे

**126.** व्याकरण आणि भाषाशास्त्र विद्यार्थ्यांनी शिकायला सुरुवात केल्यावर त्यांना काय कळायला लागते?

(1) व्याकरण शिकण्याला सर्वाधिक महत्त्व दिले पाहीजे

(2) व्याकरण हे प्राथमिक संभाषण कलेसाठी आवश्यक आहे

(3) लिखाणाच्या शैलीला व्याकरण प्रभावीत करते

(4) ही बाब संभाषणासाठी आवश्यक असून यामुळे आपल्या संभाषण कौशल्यात भर पडते

**127.** अनेक विद्यार्थ्यांसाठी लिहिणे ही किचकट आणि आवाहनात्मक क्रीया ठरते. त्यामुळे शिक्षकांनी प्रथम कशाकडे लक्ष वेधावे?

(1) संभाषणासाठी आवश्यक ठरणाऱ्या व्याकरणाच्या संज्ञा दुरुस्त करण्यावर भर द्यावा

(2) व्याकरणीय रचनेसाठी सरावाचे आयोजन करावे

(3) व्याकरणीय अचूकतेपेक्षा उद्दिष्टीत (इंग्रज़ी) भाषेबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा

(4) सोप्यात सोपे गृहपाठ द्यावे. व्याकरणाचा कमी गृहपाठ द्यावा

**128.** व्याकरणाच्या सूचनांची अंमलबजावणी नैसर्गिकरित्या केव्हा होते?

(1) जेव्हा शिक्षक नियमितपणे मात्र थोडक्यात व्याकरण वर्ग घेतो

(2) जेव्हा विद्यार्थी आपल्या लिखाणातील किंवा संभाषणातील चुका स्वतःच दुरुस्त करतो व त्या पुन्हा वापरतो

(3) जेव्हा शिक्षक त्या संबंधीच्या थोडयाच बाबी शिकवितो

(4) जेव्हा नियमित लिखाण व संभाषण सोडून व्याकरणाकडे अधिक लक्ष वेधले जाते

**129.** भाषा शिकण्याच्या संदर्भातील समस्यांवर चर्चा करताना भाषाशास्त्र समजून घेण्यासाठी सर्वाधिक योग्य

अभ्यासाच्या पद्धतीचा पर्याय कोणता असेल?

(1) लक्ष केंद्रीत वाचन

(2) उंच स्वरात वाचन

(3) शांततेत वाचन

(4) लिखित वाचनाला महत्त्व

**130.** वर्गात वनस्पती बद्दल पाठ सुरु झाला. शिक्षकांनी या विषावरील अनुभवाबाबत प्रश्न विचारले. त्यानंतर शिक्षकाने विद्यार्थ्यांचे गट तयार केले. त्यांना मिरचीच्या रोपटयाचे चित्र तयार करायला लावले. त्याला नावे द्यायला लावली. त्यानंतर प्रत्येक गटाच्या प्रतिनिधीला त्याचे सादरीकरण आणि विश्लेषण करायला सांगण्यात आले. यामधून विद्यार्थ्यांना काय मिळाले.

(1) वनस्पतीबद्दलचे ज्ञान मिळाले. चित्र काढता आली. विविध भागांना नावे देता आली

(2) भाषेच्या काही अंगाना वापरुन वनस्पतीबाबत वर्णन करता आले

(3) फक्त (1)

(4) (1) आणि (2)

**131.** गद्य वाचनापेक्षा कविता वाचन हा वेगळा अनुभव असतो. कारण विद्यार्थ्यांना यातून खालीलपैकी काय अभिव्यक्त करायचे असते

(1) अभिव्यक्तीची अधिक प्रशंसा आणि कवीच्या संदेशाचे विश्लेषण करता येते

(2) अधिक बौद्धीक अर्थ लावायचा असतो

(3) त्यातून उमगणाऱ्या अर्थाला भावनिकतेतून प्रतिसाद द्यायचा असतो

(4) भावनिक प्रतिसादांमुळे अधिक बौद्धिक क्षमतेने भावार्थ समजून घेता येतो

**132.** एखाद्या लेखाचे मूल्यमापन करताना त्या लेखातील महत्त्वाचे मुद्दे पुनर्रुक्ती न होता लेखाच्या कोणत्या भागात पुन्हा दिसून येतात

(1) लेखाच्या सुरुवातीला

(2) समारोपात

(3) दुसऱ्या परिच्छेदात

(4) लेखाच्या मध्यात

**133.** उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेतील उच्चारण समृद्ध करण्यासाठी वर्गामध्ये तंत्रज्ञानाचा वापर प्रोत्साहित करणारा ठरतो. या वाक्याशी खालीलपैकी काय सुसंगत नाही

(1) ध्वनीमुद्रण आणि ऐकणे

(2) पॉवरपॉईन्ट प्रेझन्टेशनच्या काळातील उदघोषणा

(3) पांढऱ्या बोर्डचा (फलकाचा) वापर

(4) भूमीकांचे सादरीकरण

**134.** जेव्हा मातृभाषा बोलणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वर्गात अधिक असते. तेव्हा अशा मुलांच्या वर्गात विदेशी (इंग्रजी) भाषेतील कोणताही विषय शिकवितांना शिक्षकांनी कशासाठी जागरुक असावे?

(1) त्यांच्या मातृभाषेला सांद न घालता नवीन भाषेतील त्यांचे सामर्थ्य वाढवायला हवे

(2) उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषा विषयाचे उद्दिष्ट कदाचित गाठता येणार नाही असे समजावे

(3) आपल्या अभ्यासक्रमासोबतच संवादात उद्दिष्टीत (इंग्रजी) भाषेचाही वापर करायला हवा

(4) विद्यार्थ्यांसाठी वेगळा वर्ग घ्यायला हवा

**135.** शब्द साठयाच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांना लिखाण करताना स्वतःला बरोबर व्यक्त करता येत नाही. यावर यशस्वी उपाययोजना पुढीलप्रमाणे आहे

(1) विशेष वर्ग घेऊन काही शब्दांचा सराव नियमित कालावधीनंतर करुन घ्यावा

(2) विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी प्रोत्साहीत करतानाच नवे शब्द शिकण्याकडे त्यांचे लक्ष वेधावे

(3) विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुरुप त्यांना बदलवून विषय द्यावा

(4) काही शब्द व त्याचे अर्थ पाठांतरासाठी व वाक्य उपयोगासाठी द्यावे

***सूचना*** (प्रश्न संख्या **136** ते **144**) : पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा ...

चिगऱ्या करवंदाच्या जाळीतून वाट काढत डोंगर चढतोय. पाठोपाठ चालताना शेंबाटीत अडकून शर्ट फाटला. चिगऱ्याच्या पायाची गती पकडायला पळण्याशिवाय पर्याय नव्हता. शर्ट काढून हातात घेतला. अंगभर शेंबाटीचे ओरखडे, थांबून भागणार नाही. ही संधी हुकली तर पुन्हा येईलंच असं नाही. देवाळापर्यंत बोलायचं नाही. चिगऱ्यानं घातलेली अट. आजूबाजूला कशाचाच सासूल नाही. फक्त सरड्या-पाखरांची सळसळ. चिगऱ्याच्या पायताणाचा आवाज. अजून किती लांब? विचारायचं कोणाला? मौन मोडायचं नाही. चिगऱ्या गप्पकन थांबला. लांबलचक उडी टाकून माझ्या समोर. त्यानं खुणेनं समोर दाखवलं-अस्वल. एकदम अंगाचं पाणी. दरवेशाचं अस्वल बघितलं होतं, पण हे रानटी अस्वल. काळंभोर जंगाड. त्याला आमचा सासूल लागला होता. त्यानं थांबून लालबुंद डोळे आमच्यावर रुतवलेले. चिगऱ्या चिंताक्रांत. माझ्या हातापायाची थरथर थांबत नव्हती... चिगऱ्या खुणेनं सांगत होता. मौन सोडायचं नाही. त्यानं बंडीच्या खिशातली आगपेटी काढली. कमरेचा कोयता हातात घेऊन शेजारच्या झाडाची फांदी मारली. घोंगड्याच्या खोळीतला चिंध्याचा बोळा बेनलेल्या फांदीत अडकवला. चगाळ गोळा करुन घुपा घातला. काडी पेटवली. फांदीची दिवटी झाली. अस्वलानं जागा सोडली. ते झाडांच्या गर्दीत घुसलं. भला मोठा उंच दगड समोर आल्यावर चिगऱ्या थांबला. खांद्यावरचं घोंगडं दगडासमोर ठेवलं. दगडाजवळ टेकला. खुणेनं मला बसयला लावलं. तो शेजारच्या जाळकांडात दिसेनासा झाला. तिकडून चिगऱ्या हातात पळसाच्या पानांचा बिंडा घेऊन हजर. त्यानं करवंदीचे काटे मोडून पळसाच्या पानाचे द्रोण तयार केले. या द्रोणांचं करणार काय? उत्सुकतेनं बघाय लागलो. चिगऱ्यानं मोठ्या उंच दगडाच्या बाजूलाच असणाऱ्या दगडाजवळचा एक दगड बाजूला केला. तर पाण्याचा झरा. च्या आयला, एवढ्या उंचावर हा पाण्याचा झरा. माझे डोळे आपोआपच फिराय लागले. चिगऱ्या पळसाच्या पानाचा द्रोण भरुन माझ्या हातात देत खुणेनं म्हणाला, पिऊन टाक. पाण्याचा घोट घेतला, तर नारळपाणी. आजवर असं पाणी कधीच पिलं नव्हतं. पाचसहा द्रोण घटाघट पिऊन टाकले. एकदम तरतरी. अंगात नवा उत्साह. नखशिखान्त काहीतरी सळसळत गेलं. डोंगर माझ्या आत पसरुन मीच डोंगर झाल्याचा भास... चिगऱ्यानं हळूच वाकून शीळ घातल्याबरोबर गुहेतून काळा ठिक्कर. प्रचंड मिशा. दगडाच्या सुळक्यासारखा म्हातारा समोर आला. चिगऱ्या डोकं टेकून पाया पडला. माझ्याकडं बोट दाखवत म्हणाला. तालुक्यातील कचेरीत आसतुय. जवळ जवळ दहा तासांत पहिल्यांदा ऐकलेला शब्द. म्हाताऱ्याच्या पायावर डोकं टेकवलं. त्यांच्या पायाच्या कातडीचा स्पर्श झाला आणि माझ्या अंगावरुन सर्रकर गार वाऱ्याची झुळूक तरळून गेला. अदभूत स्पर्श होता.

**136.** चिंग-या आणि लेखकाला घनदाट अरण्यात कोणते जंगली श्वापद दिसले?

(1) अस्वल

(2) वाघ

(3) सरडा

(4) गाढव

**137.** नखशिखान्त या शब्दाचा अर्थ काय?

(1) उंच शिखरावरून खाली पायथ्यापर्यंत

(2) कश्मीर ते कन्याकुमारी

(3) पायाच्या नखापासून कपाळापर्यंत

(4) नाकापासून खाली पायापर्यंत

**138.** गुहा व लेणी यातील खालीलपैकी योग्य फरक निवडा?

(1) गुहा डोंगरात तर लेणी जंगलात असते

(2) गुहेत तपश्चर्या तर लेणीत मौन पाळले जाते

(3) गुहेत माणसे तर लेणीत जंगली प्राणी राहतात

(4) गुहा लेणीच्या तुलनेत निमुळत्या जागेत असते

**139.** चिंग-याने जंगलातून जाताना कोणती अट घातली होती?

(1) जंगलात प्रवास करताना मौन तोडायचे नाही

(2) अस्वलीला घाबरायचे नाही

(3) म्हाता-याशी बोलायचे नाही

(4) डोंगरात मनसोक्त पाणी प्यायचे

**140.** या उता-यातील लेखन कोणत्या पध्दतीचे आहे?

(1) साहित्यिक

(2) श्रृंगारिक

(3) रहस्यमय

(4) साहसी

**141.** गुहेत कोण राहत होते?

(1) म्हातारा

(2) अस्वल

(3) लेखक

(4) चिंग-या

**142.** द्रोण तयार करण्यासाठी कशाची पाने वापरण्यात आली?

(1) पळसाची पाने

(2) केळीची पाने

(3) सागाची पाने

(4) शेंबाडीची पाने

**143.** लेखकाच्या हातापायाची थरथर का झाली?

(1) अंगात काटे घुसल्यामुळे

(2) ताप भरल्यामुळे

(3) अस्वलीला घाबरून

(4) म्हाता-याला बघून

**144.** झरा कशाला म्हणतात?

(1) पाण्याच्या प्रवाहाला

(2) धारदार शस्त्रला

(3) केळीच्या पानाला

(4) पाण्याच्या उगमाला

***सूचना*** (प्रश्न संख्यां **145** ते **150**) : पुढील उतारा वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची योग्य तो पर्याय निवडून उत्तरे लिहा ...

फुले आणि मुले ह्यांची वांगी आणि भात अथवा बटाटे आणि वडा ह्याप्रमाणेच एकमेकांस चिकटन असणारी टुक्कल निर्माण करुन कविलोकांनी तिचा निष्कारण का गाजावाजा चालविला आहे, हे अजून मला नीटसे उमगलेले नाही. सदरहू जोडगोळीपैकी नग नंबर एकविषयी माझी मुळीच तक्रार नाही. झेंडूच्या फुलातील खोबरे, गुलाबाच्या फुलांचा गुलकंद व केळफुलांची भाजी ह्यांचा मी बालपणापासून निस्सीम भक्त आहे. परंतु मुलांविषयी म्हणाल तर, तलवारीच्या पात्याने येरुश्लेमातील बालगोपाळांची खबर घ्यावयास निघालेल्या हेरॉड राजाची बाजू ऐकून घेण्यासारखी असली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. ह्या विषयात कविलोकांचा निर्वाळा मानावयास मी सुतराम सिद्ध नाही. ऐतिहासिक काळापासून मुलांनी सतत कविलोकांच्या काव्याचा विषय व्हावयास सिद्ध असावे व झाडून साऱ्या कवींना मूलजातीच्या एखादा तरी कवितावद्ध गालगुच्चा घेतल्याशिवाय आपल्या प्रतिभेचे सार्थक झाल्यासारखे वाटू नये, ही एक गोष्ट कवी व त्यांच्या लाडका काव्यविषय या दोघोंच्याही सारखीच विरुद्ध जाण्यासारखी आहे.

झाडावर चढणे, उनाडणे, सायकलीच्या व्हॉल्व्हटयुब्ज काढणे, फडताळे, धुंडाळणे, मास्तरांच्या खुर्चीवर खाजकुयल्या पेरणे अथवा तिचा एक पाय बेमालूम निखळून काढणे, इतिहासाच्या पुस्तकातील एलिझाबेथला मिश्या व वॉरन हेस्टिंग्जला गंध लावणे, इत्यादी अधिक उपयुक्त उद्योगात जर बालचमू मग्न नसता व तो आहे त्यापेक्षा जर अधिक साक्षर व पुस्तकप्रिय असता, तर लेखक व कवींनी आपल्याविरुद्ध करुन ठेवलेल्या बदनामीकारक कारवायांविषयी त्यांनी या काटकुळ्या व मूर्ख जातीचे केव्हाच बारा वाजविले असते.

'निरागस', 'निष्पाप', 'निर्मळ', 'निर्मत्सरी', 'स्वर्गीय', इत्यादी देदीप्यमान विशेषणांची बाळलेणी मूलमंडळींच्या अंगाखांद्यावर चढवून त्यांचा चिमणा जीव निष्कारण गुदमरुन टाकण्यात आला आहे. विशेषणांची नादमय नकारघंटाच वाजवायची असेल तर 'निर्लज्ज', 'निस्संग', 'निपटारा', 'निकामी', 'निमकहराम', इ.वास्तववादी उपपदांच्या तीटकाजळानेच त्यांचे तोंड रंगविणे अधिक योग्य ठरेल. कारण अमरलोकातही नव्हे, तर केवळ अमरकोषातच सापडणाऱ्या

ह्या स्वर्गीय गुणविशेषांचा आणि बालचमूचा काव्यकल्पनेपलीकडे इतरत्र कोठे काडीचाही संबंध नाही.

'रम्य ते बालपण देई देवा पिरुनि' ह्या ओळी केवळ विसरभोळ्या वयस्कतेचा गलथान भाबडेपणा दर्शवितात. ओलसर दुपटयावर निरुपायाच्या संतापाने हातपाय झाडत पडलेल्या, केवळ कार्यमग्न मातृदेवतेची तशी इच्छा आहे म्हणून आढे व जमीन यांची दर क्षणास भेट घेत झोके खाणाऱ्या, जगाकडे क्षणभर टक लावून पाहाण्याची इच्छा असता येत्याजात्याकडून दमटून थोपटले जाणाऱ्या व भलभलत्या हौशी गळ्यातून निंघणाऱ्या अंगाई संगीताच्या धास्तीने अखेर मूर्च्छामय निद्रासमाधीत मग्न होणाऱ्या बाळपणात काही अलौकिक आकर्षकता आहे असे मलाच काय, पण त्या अज्ञ, निरागस व निर्व्याज बालकांनाही वाटत नाही.

**145.** 'रम्य ते बालपण देई देवा फिरुनि' ह्या ओळी लेखकाच्या मते काय दर्शवितात?

(1) बालकांच्या निष्पापतेची साक्ष

(2) बाळपणात अलौकिक आकर्षकता

(3) विसरभोळ्या वयस्कतेचा गलथान भाबडेपणा

(4) कवींनी बालकांविरुद्ध केलेली बदनामीकारक कारवाई

**146.** लेखकाला बालकांसाठी खालीलपैकी कोणते विशेषण मान्य नाहीत?

(1) निपटारा

(2) निरागस

(3) निर्लज्ज

(4) निकामी

**147.** खालीलपैकी अयोग्य पर्याय कोणता?

(1) विटी–दांडू

(2) फुले–मुले

(3) काळा–कावळा

(4) अंगत–पंगत

**148.** उता-यातील लिखाण कोणत्या शैलीतील आहे?

(1) उपहासात्मक लेखन

(2) साहित्यिक

(3) निबंधलेखन

(4) ललित लेखन

**149.** नकारघंटा या शब्दाचा अर्थ काय?

(1) नकार देत घंटा वाजविणे

(2) कायम नाही म्हणणे

(3) नाकाला घंटा बांधणे

(4) कधी हो कधी नाही म्हणणे

**150.** बालपणच्या खोडयांमध्ये कोणती बाब मोडत नाही?

(1) सायकलीच्या व्हॉल्व्हटयुब्ज काढणे

(2) झाडावर चढणे

(3) एलिझाबेथला मिश्या लावणे

(4) क्रिकेटचा सामना बघणे

SPACE FOR ROUGH WORK

***खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :***

1. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉलपॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/ काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

2. परीक्षार्थींनी उत्तरपत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तरपत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

3. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

4. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

5. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.

6. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

7. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

8. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर-पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.

9. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

10. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

11. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

12. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :**

1. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with Blue/Black Ballpoint Pen on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
2. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
3. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
4. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
5. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
6. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
7. No candidate, without special permission of the Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
8. The candidates should not leave the Examination Hall without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet, a second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case.
9. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
10. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
11. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
12. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Room/Hall. *The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह नीले/काले बॉलपॉइंट पेन से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
2. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर-पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
3. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
4. परीक्षा पुस्तिका/उत्तर-पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाजिरी-पत्र में लिखें।
5. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-कार्ड के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
6. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-कार्ड दिखाएँ।
7. अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
8. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर-पत्र दिए बिना एवं हाजिरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाजिरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर-पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा।
9. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
10. परीक्षा हॉल में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
11. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर-पत्र का कोई भाग अलग न करें।
12. परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी कक्ष/हॉल छोड़ने से पूर्व उत्तर-पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें। *परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।*